**पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर.**
जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp.palghar@mahapolice.gmail.com

**प्रेसनोट क्र. ७३ दिनांक २६/०९/२०२३**

# पालघर पोलीस दलाकडुन “आदर्श इद-ए-मिलाद जुलूस” पुरस्काराचे आयोजन

इस्लाम धर्माचे प्रेषित मोहम्मद पैगंबर यांचा जन्मदिवस ‘इद-ए-मिलाद उन नबी म्हणुन जगामध्ये सर्वत्र साजरा केला जातो. प्रेषित मोहम्मद पैगंबर यांचे महान कार्य आणि त्यांनी जगाला दिलेली शिकवण यांचा आदर्श या दिवशी जागवला जातो. तसेच या दिवशी प्रषित मोहम्मद पैगंबर यांचे प्रवित्र वचने वाचतात. मुस्लीम बांधव मश्जिदीमध्ये व घरामध्ये पवित्र कुराण वाचतात आणि मोहम्मद पैगंबर यांनी सांगितलेप्रमाणे धार्मिकतेच्या मार्गावर चालणेसाठी प्रेरित होतात. महाराष्ट्र राज्यात प्रेषित मोहम्मद पैंगबर यांचे मश्जिदीमध्ये विशेष सजावट करुन नमाज पठण केली जाते. यावेळी त्यांचे संदेश वाचण्याबरोबच गरीबांना दान करण्याची प्रथा आहे. सर्व मुस्लीम बांधव हे शांततापुर्ण मिरवणुका काढुन आनंद व्यक्त करतात. मुस्लीम धर्मिय पैगंबरांचे महान जीवनकार्य आणि शिकवण या पासुन प्रेरणा घेवुन आपल्या आयुष्याची सुरवात करतात. मुस्लीम धर्मिय सर्वत्र शुभ संदेश असलेले होर्डीग, बॅनर्स प्रदर्शित करतात तसेच मिठाईचे वाटप केले जाते. धार्मिक प्रवचने ऐकायला लोकं जमा होतात. मोहम्मद पैगंबर यांचे महान जीवनकार्याची आठवण करीत ते आपला दिवसाची सुरवात करतात. त्यांच्यावर कविता, लेख लिहीले जातात. कलावंत, चित्रकारी, शिल्पकला या माध्यमातुन त्यांच्या जीवनकार्याचे प्रदर्शन घडवतात.

चालु वर्षी अंनत चतुर्दशी अर्थात दिनांक २८/०९/२०२३ रोजी दहा दिवसाचे गणरायांचे विसर्जन आणि इद-ए-मिलाद उन नबी, हिन्दु व मुस्लीम बांधवांचे असे दोन्ही सण एकाच दिवशी साजरे होणार आहेत. पालघर जिल्हयात दिनांक २८/०९/२०२३ रोजी १० दिवसांचे सार्वजनिक गणपतींच्या ३७१ मिरवणुका व खाजगी गणपतींच्या ८०४ मिरवणुका निघणार आहेत. तसेच मुस्लीम बांधवांच्या इद-ए-मिलाद उन नबी च्या एकुण २५ जुलुस आहेत. सदर दोन्ही सणांच्या मिरवणुका व जुलुस हिन्दु व मुस्लीम बांधवांकडुन उत्साहाने निघतात. परंतु पालघर जिल्हयातील दोन्ही सण हे शांततेत साजरे व्हावेत, त्याचप्रमाणे सामाजिक सलोखा जोपासला जावा या उद्देशाने पालघर जिल्हयातील मुस्लीम बांधवांचे सर्व मश्जिदचे ट्रस्टी तसेच जबाबदार मुस्लीम नागरिकांनी पुढाकार घेवुन इद-ए-मिलाद उन नबी जुलुस दिनांक २८/०९/२०२३ रोजीचे ऐवजी दिनांक २९/०९/२०२३ रोजी काढण्याचा महत्वपुर्ण निर्णय घेवुन संपुर्ण महाराष्ट्रात पालघर जिल्हयातील मुस्लीम बांधवांनी आदर्श निर्माण करुन मुस्लीम बांधवांबरोबरच हिन्दु बांधवांनादेखील सदरचे कार्य व निर्णय प्रेरणादायी ठरलेला आहे. पालघर

जिल्हयातील मुस्लीम बांधवांनी घेतलेल्या या निर्णयामुळे पालघर जिल्हा पोलीस दलातील यंत्रणेवर येणारा बंदोबस्ताचा अतिरिक्त ताण कमी करणेसाठी महत्वाची भुमिका बजावली आहे.

जे मुस्लीम बांधव इद-ए-मिलाद उन नबी जुलुस शिस्तबध्द पध्दतीने पारंपारिक वाद्याचा उपयोग करुन वेळेचे पालन करतील अशा एका जुलुसास पालघर जिल्हा पोलीस दलातर्फे आदर्श इद-ए-मिलाद उन नबी जुलुस पुरस्कार देण्यात येणार आहे. इद-ए-मिलाद उन नबी जुलुसाची निवड करणेकरीता अपर पोलीस अधीक्षक यांचे अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आलेली आहे. या समितीमध्ये शांतता कमिटी सदस्य, जुलुस समितीमधील पदाधिकारी यांचा समावेश असणार आहे. निवड झालेल्या जुलुस समितीचे पदाधिकारी यांना पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करण्यात येणार आहे. जिल्हास्तरावरील गणराया पुरस्कार व इद-ए-मिलाद जुलुस पुरस्कार या दोन्ही पुरस्काराचे वितरण एका दिमाखदार कार्यक्रमात सन्मानीत व्यक्तीच्या हस्ते करण्यात येणार आहे.

तरी आगामी साजऱ्या होणाऱ्या इद-ए-मिलाद उन नबी, या सणासाठी श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक पालघर यांनी पालघर जिल्हा पोलीस दलाच्या वतीने सर्व मुस्लीम बांधवाना शुभेच्छा दिल्या असून इद-ए-मिलाद उन नबी, सण शांततेत साजरा करण्याचे आवाहन केले आहे.